# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

मुख्य कचेरी : ४ ब, बी.जे. रोड, पुणे - ४११००१.

PDCC BANK ✻ पो. बॉक्स नं.१०९ ✻ दुरध्वनी क्र.: २६१३३८३३, २६१३९३००. ई-मेल: ho@pdccbank.com


## ✻ उमेदवारांसाठी महत्वाच्या सुचना ✻

१. बँकेच्या लेखनिक पदाची ऑनलाईन परीक्षा दि. २२.०८.२०२५ ते दि. २५.०८.२०२५ या कालावधीत पुणे जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात आलेली आहे.

२. ऑनलाईन परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र (https://pdccb.recruitlive.in) ह्या संकेतस्थळावर दि. १४.०८.२०२५ रोजीपासून उमेदवाराच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

३. बँकेच्या संकेतस्थळावर उमेदवारांच्या लॉगिनमध्ये प्रवेशपत्र उपलब्ध असलेबाबतची माहिती उमेदवारांच्या नोंदणीकृत ई–मेल/मोबाईलवर एस.एम.एस.द्वारे पाठविण्यात येईल. (ई–मेल आय.डी. च्या संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना बँक/संस्था जबाबदार राहणार नाही)

४. उमेदवारास प्रवेशपत्र फक्त ऑनलाईन पध्दतीनेच डाऊनलोड करता येईल. टपाल किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे प्रवेशपत्र पाठविण्यात येणार नाही.

५. बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल.

६. उमेदवारांनी प्रवेश पत्रातील सर्व सुचनांचे अवलोकन करून पालन करावे.

७. परिक्षेच्या ठिकाणी परीक्षा प्रवेशपत्र, एक मुळ ओळखपत्र व त्या ओळखपत्राची छायांकित प्रत उमेदवारासोबत असणे बंधनकारक आहे. ओळखपत्र म्हणून आधार कार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट, मतदान कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायविंग लायसन्स) यापैकी एक मुळ स्वरूपात ग्राह्य धरण्यात येईल.

८. ज्या उमेदवारांच्या नावामध्ये बदल/ओळखपत्रातील नाव व प्रवेशपत्रातील नाव यामध्ये तफावत असल्यास विहित नमुन्यातील हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्याकरीता आवश्यक ते कागदपत्र परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षक यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहील.

९. महिला उमेदवारांचे अर्जातील नाव व ओळखपत्रातील नावात बदल असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र व विहित नमुन्यातील हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१०. ऑनलाईन परिक्षेच्यावेळी उमेदवारांचे बायोमेट्रिक उपस्थिती नोंद करण्यात येणार असल्याने त्यासाठी लागणारा वेळ विचारात घेवून उमेदवारांनी प्रवेशपत्रामध्ये नमुद केलेल्या निर्धारित वेळेपुर्वी परिक्षा केंद्रावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

११. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दि. ०७.०८.२०२१ रोजीच्या जाहिरातीतील नमूद सुचनांचे अवलोकन करून पालन करणे उमेदवारांवर बंधनकारक आहे. बँकेने प्रसिध्द केलेल्या दि. ०७.०८.२०२१ रोजीच्या जाहिरातीमध्ये नमूद केलेला अभ्यासक्रम खालीलप्रमाणे :–

| अ.क्र | विषयाचे नाव | गुणांचे भारांकन |
|---|---|---|
| १ | बँकींग व सहकार | ३० |
| २ | सामान्य ज्ञान व चालू घडामोडी | २० |
| ३ | कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था | १० |
| ४ | मराठी भाषा ज्ञान | १० |
| ५ | संगणक व माहिती तंत्रज्ञान | १० |
| ६ | बुद्धीमापन चाचणी | १० |
| | एकूण गुण | ९० |

१२. ऑनलाईन परिक्षेचे माध्यम मराठी असून एकूण ९० गुणांची परीक्षा असेल ऑनलाईन परीक्षेसाठी एकूण ९० प्रश्नांचा समावेश असून प्रत्येक प्रश्नास १ गुण राहील व ऑनलाईन परीक्षेसाठी ९० मिनीटे कालावधी असेल.

१३. ऑनलाईन परिक्षा एका पेक्षा अधिक सत्रामध्ये घेण्यात येणार असल्याने सामान्यीकरण (Equi-percentile Method of Normalization) पद्धतीचा अवलंब करुन उमेदवारांच्या ऑनलाईन परिक्षेतील प्राप्त गुणांचे सामान्यीकरण करण्यात येईल. त्यानुसार अंतिम गुण (Cut off Mark) निश्चित करण्यात येतील.

१४. भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने अद्ययावत माहितीसाठी उमेदवारांनी वेळोवेळी बँकेच्या संकेतस्थळाला भेट देणे आवश्यक आहे.

(स्वाक्षरी)

मुख्य कार्यकारी अधिकारी